ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान-ग्रामीण

**विभाग -** ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**वैशिष्ट्ये -** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी अभियानाची अंमलबजावणी.

**उद्देश -**

- ग्रामीण गृहनिर्माण योजनांना गतिमान करणे.
- योजनांमध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.
- नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांची गुणवत्ता वाढविणे.
- लाभार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.
- भागधारकांची क्षमता बांधणी व जन-जागृतीद्वारे चळवळ उभी करणे.

**अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम -**

- भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.
- घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे.
- मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण.
- सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करणे.
- प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे.
- ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे.
- डेमो हाऊस (Demo House) निर्मिती व उपयोग.
- लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉबकार्ड मॅपिंग पूर्ण करणे.
- शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे.
- नावीन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे.

ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

विभाग - पंचायतराज विभाग, भारत सरकार

उद्देश - भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध पातळीवर साजरा करण्यात येत आहे.

राबवावयाचे उपक्रम -

- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देऊन घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे.
- आवास प्लस ('ड' यादी) मधील कुटूंबांचे १००% आधार सिडिंग, १००% जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करुन प्राधान्यक्रम यादी(Priority List) तयार करणे व उद्दिष्टानुसार मंजूरी देऊन घरकुले पूर्ण करणे.
- राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये गुणवत्ता आणण्याच्या दृष्टीकोनातून नवनवीन संकल्पना राबविणे.
- राज्याचे ग्रामीण गृहनिर्माण धोरण विकसीत करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी 'महा आवास अभियान-ग्रामीण' अधिक प्रभावीपणे राबवून अभियान कालावधीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देणे.

ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान पुरस्कार

**विभाग -** ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**उद्देश -** "महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था वा व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविणे.

**पुरस्कार निवड -** शासन निर्णयातील निकषानुसार त्या त्या स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत पुरस्कारांची निवड करण्यात येईल.

**वैशिष्ट्ये -** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांकरीता स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरूप -** राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुकास्तरावरील पुरस्कार विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक तर ग्रामपंचायत स्तरावरील विजेत्यांना प्रशस्तिपत्रक देवून गौरविण्यात येईल.





ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

## महा आवास अभियान विशेष पुरस्कार

**विभाग** - ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**उद्देश** - "महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत अभियान कालावधील विविध उपक्रमांच्या संख्यात्मक प्रगतीनुसार राज्यस्तरावरून सर्वोत्कृष्ट ३ जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात येतील.

**पुरस्कार निवड** - शासन निर्णयातील निकषानुसार गुणांकन करून केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या एकत्रित गुणांच्या आधारे पुरस्कारांची निवड करण्यात येईल.

**वैशिष्ट्ये** - केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांकरीता काही पुरस्कार स्वतंत्र देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरूप** - राज्यस्तरावरून पुरस्कार विजेत्या संस्थाना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देवून गौरविण्यात येईल.




